# निबंधात्मक अहवाल

## विशेष श्रम संस्कार शिबिर

डॉ.राजेंद्र गोडे फार्मसी महाविद्यालय मलकापूर,
राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या
श्रमसंस्कार निवासी शिबिराचे कुंड खुर्द येथे
दिनांक **26** फेब्रुवारी **2023** ते **4** मार्च **2023** आयोजन

## निबंधात्मक अहवाल

## विशेष श्रम संस्कार शिबिराचे पूर्वनियोजन ( प्रास्ताविक)

आमच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम कुंड खुर्द तालुका मलकापूर जिल्हा बुलढाणा येथे दिनांक 25/ 02/ 2023 ते 04/03/ 2023 या दरम्यान आयोजित करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एम.डब्ल्यू. बाभुळकर, सह कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक आर आर पोपट, तसेच महिला कार्यक्रम अधिकारी सी. एस. चांडक यांच्या नेतृत्वात घेण्याचे ठरले. राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण 50 विद्यार्थ्यांचे नामांकन झालेले असून त्यापैकी 25 विद्यार्थी विशेष श्रम संस्कार शिबिरासाठी येण्यास तयार झाले. सर्व 25 स्वयंसेवकांनी शिबिराला येण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र स्वतःच्या व पालकांच्या स्वाक्षरीनिशी लिहून दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. के. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरादरम्यान माझ्या माध्यमातून "निर्मल ग्राम स्वच्छता अभियान" हा प्रकल्प हाती घेण्यात आला. तसेच व्यक्तिमत्व विकास, पर्यावरण जनजागृती, आरोग्य जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, ऑनलाइन आर्थिक व्यवहारात संबंधित जनजागृती करण्याचे ठरले, तसेच दुपारच्या सत्रात विविध बौद्धिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरले. निमंत्रण पत्रिका तयार करून सर्व मान्यवरांना पाठवण्यात आल्या.

### ✻ शिबीरास सदिच्छा भेटी ✻

मा. डॉ. प्रमोद येवले, कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
मा. डॉ. तुषार देशमुख, कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
मा. श्री. योगेंद्रजी गोडे, अध्यक्ष, इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बुलढाणा
मा. श्री. निखील भुयार , गट शिक्षण अधीकारी पंचायत समिती अधिकारी, मलकापूर
मा. सदस्य रासेयो सल्लागार समिती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती
मा. डॉ. राजेश बुरंगे, समन्वयक, रासेयो संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
मा. प्रा.डॉ. विष्णु पडवाल, जिल्हा समन्वयक, रासेयो बुलढाणा जिल्हा
मा. प्रा. डी.एम. दरेगावे, रासेयो, क्षेत्रीय समन्वयक, मलकापूर विभाग
प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी- डॉ. राजेंद्र गोडे फार्मसी महाविद्यालय, मलकापूर

### ✻ शिबीरातील दैनंदिन कार्यक्रम ✻

| | | | |
|---|---|---|---|
| प्रार्थना, प्राणायम व योगाभ्यास | स. ६ ते ७ | बौध्दिक सत्र | दु. ३ ते ५.३० |
| अल्पोपहार | स. ७ ते ७.३०. | गावकऱ्यांशी चर्चा | दु. ५.३० ते ६.३०. |
| श्रमदान | स. ७.३० ते १०.३० | प्रार्थना, स्फुर्तीगिते | सायं. ६.३० ते ७ |
| भोजन व वैयक्तीक स्वच्छता | दु. १२.३० ते ३ | भोजन | रात्री ७ ते८ |
| | | सांस्कृतिक कार्यक्रम | रात्री ८ ते १० |

### ✻ शिबीरा दरम्यान राबवायचे उपक्रम ✻

१) ग्रामस्वच्छता, २) मोफत आरोग्य तपासणी, ३) श्रमदान, ४) वित्तीय साक्षरता, ५) व्यक्तीमत्व विकास, ६) पर्यावरण जागृती, ७) अंधश्रध्दा निर्मुलन व जन जागृती ८) महिला सक्षमीकरण

*-शिबीराचे दरम्यान राबवायचा प्रकल्प-*

*-निर्मल ग्राम स्वच्छता अभियान*

प्रेषक :
**प्रा. मुकेश बाभुळकर**
**प्रा. रितेश पोपट**
**प्रा. चंचल चांडक**
डॉ. राजेंद्र गोडे फार्मसी महाविद्यालय, मलकापूर

बुक-पोष्ट
प्रति,
श्री./श्रीमती ____________

टिप- कुंड खुर्द हे गाव मलकापूर पासुन ३ किमी अंतरावर आहे.

**खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे**

ओंकार प्रिंटर्स,नारखेडे कॉम्प्लेक्स, मलकापूर ,8308048102

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
द्वारा संलग्नित
इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था बुलढाणा द्वारा संचलित
**डॉ. राजेंद्र गोडे फार्मसी महाविद्यालय, मलकापूर**
जि. बुलढाणा- ४४३ १०१
राष्ट्रीय सेवा योजना द्वारा आयोजित
**विशेष श्रम संस्कार शिबीर**
दि. २५/०२/२०२३ ते ०४/०३/२०२३

**शिबीर स्थळ- दत्तक ग्राम कुंड खुर्द** ता. मलकापूर, जि. बुलढाणा

### ✻ निमंत्रण पत्रिका ✻

श्री./श्रीमती ____________

आमच्या महाविद्यालयाचे २०२२-२०२३ या सत्रातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे **विशेष श्रम संस्कार शिबीर दि. २५/०२/२०२३ ते ०४/०३/२०२३** या दरम्यान दत्तकग्राम कुंड खुर्द, ता. मलकापूर, जि. बुलढाणा येथे आयोजीत करण्यात येत आहे. या शिबीरातील विविध कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

### ✻ आपले विनीत ✻

डॉ. प्रशांत कृष्णराव देशमुख (प्राचार्य, डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी, मलकापूर)
प्रा. मुकेश वामनराव बाभुळकर (रासयो, कार्यक्रम अधिकारी)
प्रा. रितेश पोपट (रासयो, सह कार्यक्रम अधिकारी)
प्रा. चंचल चांडक (रासयो, महिला कार्यक्रम अधिकारी)
श्री. अनंत भुसकट (पथक प्रमुख-मुले)
कु. शुभांगी काकडे (पथक प्रमुख-मुली)
सौ.वैशाली राकेश पाटील (सरपंच, कुंड खुर्द)
श्री शेषराव निनाजी फुलपगारे (उपसरपंच, कुंड खुर्द)
श्री. पुरुषोत्तम ज्ञानदेव खर्चे (ग्राम सेवक कुंड खुर्द)
श्री. शिवाजी मारोती क्षिरसागर (मुख्याध्यापक प्राथमीक शाळा कुंड खुर्द)
श्री.मनोहर वराडे (ग्रामपंचायत सदस्य कुंड खुर्द)
श्री अशोक झनके (तंन्टा मुक्ती अध्यक्ष)

सर्व शिक्षकवृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व सन्माननीय ग्रामपंचायत समिती सदस्य तथा सर्व ग्रामस्त मंडळी,कुंड खुर्द

**युवकांचा ध्यास , ग्राम शहर विकास**

## शिबिराचा पहिला दिवस

## दिनांक 25/02/2023, शनिवार

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रम संस्कार शिबिराच्या पहिला दिवस म्हणजे शिबिरासाठी स्वयंसेवकांचे शिबिर स्तरी आगमन. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे 25 स्वयंसेवक दिनांक 25/2/2023 रोजी ठीक 11 वाजता महाविद्यालयामध्ये उपस्थित झाले. सर्व स्वयंसेवकांची दत्तक ग्राम कुंड खुर्द येथे जाण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व्यवस्था करण्यात आली. साधारणतः दुपारच्या दोन वाजता सर्व स्वयंसेवक दत्तक ग्राम खुर्द येथे शिबिर स्थळी दाखल झाले. त्यानंतर सर्व शिवम सेवकांची नोंदणी करण्यात आली व त्यांची पाच गटात विभागणी करण्यात आली. गट विभागणी झाल्यानंतर संपूर्ण निवास परिसराची स्वच्छता करण्यात आली त्यानंतर स्वयंसेवकांनीच लागणाऱ्या मंडपाचे उभारणी केली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंड खुर्द चे मुख्याध्यापक माननीय श्री शिवाजी क्षीरसागर सर यांच्या सहकार्याने स्वयंसेवकांची निवास व्यवस्था करण्यात आली.

सायंकाळी ठीक 6 वाजता सर्व स्वयंसेवकांनी गावात "युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास"असे नारे देत गाव फेरी मारून ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या त्यांच्यासोबत चर्चा केली व गावाची पाहणी केली त्यानंतर ग्रामस्वच्छता अभियान हा प्रकल्प हाती घेण्याचे ठरले त्यासोबतच आरोग्य जनजागृती, व्यक्तिमत्व विकास, अंधश्रद्धा निर्मूलन, ऑनलाइन आर्थिक व्यवहार याविषयी कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले.




डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलढाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
REDMI NOTE 9 PRO MAX
अनंतराव


डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलढाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910818°
Long 76.198834°
25/02/23 06:29 PM GMT +05:30
Google

## शिबिराचा दुसरा दिवस

## दिनांक 26/ 2/ 2023 रविवार

या दिवशी सकाळी 5.30 वाजता सर्व स्वयंसेवक उठल्यानंतर सर्व शिबिरार्थ्यांनी दैनिक कार्यक्रम झाल्यानंतर 6 ते 7 दरम्यान प्रार्थना व योग अभ्यास घेण्यात आला. सकाळी 7.30 ते 8.00 च्या दरम्यान अल्पोपहार देण्यात आला आणि श्रमदानाचा कार्यक्रम साधारणतः 11 वाजेपर्यंत चालला. त्यानंतर उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले.डॉ.राजेंद्र गोडे फार्मसी महाविद्यालय मलकापूर, राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या श्रमसंस्कार निवासी शिबिराचे कुंड खुर्द येथे उद्घाटन.

आज दिनांक 26 फेब्रुवारी 2023 रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकामार्फत दत्तक ग्राम कुंड खुर्द येथे श्रम संस्कार निवासी शिबिराचे आयोजन दिनांक 26 फेब्रुवारी 2023 ते 4 मार्च 2023 पर्यंत करण्यात आले. सदर शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख लाभले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून दत्तक ग्राम कुंड खुर्द च्या महिला सरपंच सौ. वैशाली राकेश पाटील या लाभल्या. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आली. सदर  उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मुकेश बाभुळकर यांनी प्रास्ताविक पर भाषण केले आपल्या भाषणात त्यांनी सदर शिबिरामध्ये राबवण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती उपस्थितांना दिली. यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक गावच्या महिला सरपंच वैशाली राकेश पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख यांनी स्वयंसेवकांना शिबिरामध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबवण्याचे सूचना केल्या व स्वयंसेवकांना प्रेरित केले. सदर कार्यक्रमाला गावातील नागरिक तसेच तंटामुक्ती अध्यक्ष श्री. अशोक झनके, ग्रामसभा सदस्य श्री.मनोहर वराडे, गावचे पोलीस पाटील श्री प्रवीण वराडे, सदर शिबिर आयोजनास बहुमूल्य सहकार्य करणारे श्री राकेश पाटील हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये शिबिरात सहभागी सर्व स्वयंसेवक,राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी चंचल चांडक, महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.महेश मोरे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कर्मचारी सतीश घनोकार व निनाजी कांडेलकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेविका दिशाली तिलोकार हिने तर आभार प्रदर्शन रासेयो स्वयंसेवक अनुप तेलगोटे यांनी केले. उद्घाटन पर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर सर्व मान्यवरांनी व स्वयंसेवकांनी भोजन केले. भोजनानंतर सर्व स्वयंसेवकांनी विश्रांती घेतली. सायंकाळी 5 वाजता सर्व स्वयंसेवकांनी मिळून शाळेची स्वच्छता केली. त्यानंतर सर्व स्वामी सेवकांनी प्रार्थना म्हटली व त्यानंतर साधारणतः 8 वाजता भोजनानंतर शिबिरार्थी आपापल्या निवासस्थानी झोपण्यासाठी गेले. अशा रीतीने दुसरा दिवस संपला.


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910705°
Long 76.198876°
26/02/23 01:50 PM GMT +05:30
Google


डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.91071°
Long 76.198854°
26/02/23 02:01 PM GMT +05:30
Google

## शिबिराचा तिसरा दिवस

## दिनांक 27/ 02 /2023 सोमवार

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा तिसरा दिवस म्हणजे दिनांक 27 फेब्रुवारी 2023, सोमवार या दिवशी सकाळी 6.00 ते 7.00 वाजताच्या दरम्यान प्रार्थना, प्रार्थना प्राणायाम योगाभ्यास घेण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवकांना अल्पपवार देण्यात आला. सकाळी 7.30 वाजता दत्तक ग्राम कुंड खुर्द येथील सार्वजनिक ठिकाणी जसे मनुदेवी मंदिर संस्था व विठ्ठल मंदिर संस्थान यांची स्वयंसेवकांद्वारे निर्मल ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता करण्यात आली तसेच गावातील सार्वजनिक रस्त्यांवर पडलेली गिट्टी जी रहदारीसाठी अडथळा निर्माण करत होती की एका बाजूला स्वयंसेवकाद्वारे लावण्यात आली. श्रमदान दुपारी 12.00 वाजेपर्यंत चालले त्यानंतर स्वामी सेवकांनी वैयक्तिक स्वच्छता व भोजन करून आराम केला.

### बौद्धिक सत्र

दुपारी 3.00 वाजता बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले. या बौद्धिक सत्र मध्ये सौ प्रणाली खर्चे, आहार व योग चिकित्सा तज्ञ यांनी स्वयंसेवकांना योग्य आहार व त्याचा शारीरिक व मानसिक परिणाम याचे महत्त्व आपल्या सत्रामध्ये पटवून सांगितले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात आहाराचे पाच प्रकार पाच प्रकार सांगितले व त्यामधून कशा प्रकारे पोषण तत्वे मिळतात याची सविस्तर माहिती दिली. या सत्राचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवीका कुमारी आचल वाघोडे हे केले तर आभार प्रदर्शन प्रेम सिंग राजपूत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी केले, सायंकाळी 5.30 वाजता कार्यक्रमात झाली.

बौद्धिक सत्र संपल्यानंतर शिबिरार्थी यांनी काही मैदानी खेळ खेळले व त्यानंतर प्रार्थना देशभक्तीपर गीत गायले. रात्री आठ वाजता भोजनानंतर काही सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले








GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+HGQ, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.911492°
Long 76.198718°
27/02/23 10:40 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+HGQ, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.911396°
Long 76.198734°
27/02/23 10:12 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W55X+WJM, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.909741°
Long 76.198951°
27/02/23 10:54 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W55X+RHW, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.909643°
Long 76.198894°
27/02/23 11:00 AM GMT +05:30
Google


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नीत
डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
आज़ादी का अमृत महोत्सव
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
दत्तक ग्राम : कुंड खुर्द ता.मलकापूर जि.बुलडाणा
युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910852°
Long 76.198787°
27/02/23 03:32 PM GMT +05:30


डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
सेवा योजना
SERVICE SCHEME
REDMI NOTE 8 PRO
MR.SK_STAR
27/02/2023 15:43

## शिबिराचा चौथा दिवस


## दिनांक 28/ 2 /2023, मंगळवार

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा चौथा दिवस म्हणजे दिनांक 28/02/2023 रोज मंगळवार या दिवशी सकाळी 6.00 वाजता प्रार्थना योगासने आणि 8.00 वाजता अल्पपोहारा नंतर सर्व स्वयंसेवक निर्मल ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत श्रमदान करण्याकरिता निघाले आज त्यांनी दत्तक ग्राम कुंड खुर्द मधील स्वर्गीय अण्णाभाऊ साठे सभागृह बुद्ध विहार, आणि निंबा देवी मंदिर संस्थान या सार्वजनिक ठिकाणांची ग्रामस्थांसोबत स्वच्छता केली. सर्व स्वयंसेवक दुपारी 12.00 वाजता शिबिराच्या ठिकाणी परतले त्यानंतर वैयक्तिक स्वच्छता आणि भोजन करण्यात आले.

## बौद्धिक सत्र आणि ध्यान साधना

दुपारी ठीक 3.00 वाजता बौद्धिक क्षेत्राला सुरुवात झाली. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक मंगेश देवकर व हॉट फुलनेस संस्थेच्या आशाताई धंदारे आणि सुजाता मॅडम उपस्थित होते. प्राध्यापक मंगेश देवकर सरांनी ग्राम शहर विकासामध्ये युवकांची भूमिका या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांना समाजकार्य करण्याकरिता प्रेरित केले. यानंतर हॉट फुलनेस संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना ध्यान साधनेचे प्रशिक्षण देण्याकरिता आशाताई धंदारे यांनी मार्गदर्शन केले. बौद्धिक सत्र चे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक शरीफ कारभारी आणि आभार प्रदर्शन स्वयंसेविका वैष्णवी अंजुलकर हिने केले. बौद्धिक सत्र संपल्यानंतर सायंकाळी 5.30 वाजता मैदानी खेळ खेळून विद्यार्थ्यांनी प्रार्थना आणि रात्री 8.00 वाजता भोजन केले अशाप्रकारे शिबिराचा चौथा दिवस संपला.




GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra
443112, India
Lat 20.910553°
Long 76.197988°
28/02/23 09:08 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112,
India
Lat 20.910563°
Long 76.198327°
28/02/23 09:05 AM GMT +05:30
Google


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नीत
डॉ. राजेंद्र गोंडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910852°
Long 76.198787°
28/02/23 03:31 PM GMT +05:30


REDMI NOTE 9 PRO MAX
अनंतराव


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नीत
डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
दत्तक ग्राम : कुंड खुर्द ता.मलकापूर जि.बुलडाणा
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910852°
Long 76.198787°
28/02/23 04:21 PM GMT +05:30


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910852°
Long 76.198787°
28/02/23 04:29 PM GMT +05:30


राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
REDMI NOTE 9 PRO MAX

## शिबिराचा पाचवा दिवस

## दिनांक 01/ 03/2023, बुधवार

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस म्हणजे दिनांक 01/03/2023 रोज बुधवार या दिवशी सकाळी 6.00 वाजता प्रार्थना योगासने आणि 8.00 वाजता केला त्यानंतर श्रमदानासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्याकरिता ग्रामपंचायत कुंड खुर्द यांच्यामार्फत  पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेकरिता नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले त्यामध्ये सर्व स्वयंसेवकांनी पाईप साठी गड्डे खोदणे त्या गड्ड्यामध्ये पाईप ठेवून गड्डे बुजवणे याकरिता श्रमदान केले. सर्व स्वयंसेवक दुपारी 12.00 वाजता शिबिरा मध्ये परतले त्यानंतर वैयक्तिक स्वच्छता आणि भोजन करण्यात आले.

## बौद्धिक सत्र आणि ध्यान साधना

दुपारी ठीक 3.00 वाजता बौद्धिक क्षेत्राला सुरुवात झाली. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री सचिन सातव सर औषध निर्माण अधिकारी सामान्य रुग्णालय मोताळा व हॉट फुलनेस संस्थेच्या आशाताई धंदारे आणि सुजाता मॅडम उपस्थित होते. श्री सचिन सातव सरांनी " आजचा युवक व राष्ट्र या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना निर्मितीमध्ये युवकांचा सहभाग किती महत्त्वाचा आहे हे पटवून दिले त्यांना समाजकार्य करण्याकरिता प्रेरित केले. यानंतर हॉट फुलनेस संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना ध्यान साधनेचे प्रशिक्षण देण्याकरिता आशाताई धंदारे यांनी मार्गदर्शन केले. बौद्धिक सत्र चे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक गौरव बानाईत आणि आभार प्रदर्शन स्वयंसेविक पराग तायडे यांनी केले. बौद्धिक सत्र संपल्यानंतर सायंकाळी 6.00 सर्व स्वयंसेवक गावातील विठ्ठल मंदिरामध्ये आरती करण्याकरिता गेले व आरतीनंतर उपस्थित गावकऱ्यांना उद्याच्या नियोजित अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमाबद्दल माहिती दिली व सर्वांना कार्यक्रमास येण्याचे आवाहन केले तसेच गावातील चौकात चौकामध्ये जाऊन या कार्यक्रमाबद्दल माहिती व निमंत्रण गावकऱ्यांना देण्यात आले आणि रात्री 8.00 वाजता भोजन केले अशाप्रकारे शिबिराचा पाचवा दिवस संपला.



REDMI NOTE 8 PRO
MR.SK_STAR
01/03/2023 08:46




GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910877°
Long 76.19861°
01/03/23 08:48 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Google
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112,
India
Lat 20.910877°
Long 76.19861°
01/03/23 08:48 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Kund Khurd, Maharashtra, India
W54X+X7, Kund Khurd, Maharashtra 443112,
India
Lat 20.907483°
Long 76.198246°
01/03/23 09:06 AM GMT +05:30


डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910739°
Long 76.19888°
01/03/23 04:41 PM GMT +05:30
Google


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नीत
डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
दत्तक ग्राम : कुंड खुर्द ता.मलकापूर जि.बुलडाणा
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910709°
Long 76.198865°
01/03/23 04:19 PM GMT +05:30
Google

## शिबिराचा सहावा दिवस

## दिनांक 02/03/2023, गुरुवार

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सहावा दिवस म्हणजे दिनांक 02/03/2023 रोज गुरुवार या दिवशी सकाळी 6.00 वाजता प्रार्थना योगासने आणि 8.00 वाजता अल्पपोहारा नंतर सर्व स्वयंसेवक निर्मल ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत श्रमदान करण्याकरिता निघाले आज त्यांनी दत्तक ग्राम कुंड खुर्द मधील सद्‌गुरु संवर्धन केंद्र या सार्वजनिक ठिकाणांची ग्रामस्थांसोबत स्वच्छता केली. सर्व स्वयंसेवक दुपारी 12.00 वाजता शिबिराच्या ठिकाणी परतले त्यानंतर वैयक्तिक स्वच्छता आणि भोजन करण्यात आले.

### बौद्धिक सत्र आणि ध्यान साधना

दुपारी ठीक 3.00 वाजता बौद्धिक क्षेत्राला सुरुवात झाली. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री प्रमोद टाले साहेब जिल्हा कार्यक्रम अधिकारी एड्स नियंत्रण समिती बुलढाणा व हॉट फुलनेस संस्थेच्या आशाताई धंदारे आणि सुजाता खर्चे उपस्थित होते. श्री प्रमोद टाले साहेबांनी " नियंत्रण व जनजागृती या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व व त्यांनी एड्स बद्दल समाजामध्ये समाज माध्यमांद्वारे चुकीची माहिती माहिती कशी पसरल्या जाते याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले व आपण अशा माहितीचा प्रचार आणि प्रसार करू नये तर योग्य माहिती समाजापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यानंतर हॉट फुलनेस संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना ध्यान साधनेचे प्रशिक्षण देण्याकरिता आशाताई धंदारे यांनी ध्यान साधनेमध्ये आत्म अनुभव याबद्दल मार्गदर्शन केले. बौद्धिक सत्र चे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक तेजस गायगोल आणि आभार प्रदर्शन स्वयंसेविक अभिषेक जोहरी यांनी केले. बौद्धिक सत्र संपल्यानंतर सायंकाळी 5.30 वाजता स्वयंसेवकांनी 6.00वाजता नियोजित अंधश्रद्धा निर्मूलन जनजागृती कार्यक्रमासाठी तयारी केली .

### अंधश्रद्धा निर्मूलन जनजागृती कार्यक्रम

श्री प्रमोद टाले अध्यक्ष अंधश्रद्धा निर्मूलन समिती बुलढाणा हे मार्गदर्शक म्हणून कार्यक्रमास लाभले कार्यक्रमाचे श्री मनोहरजी वराडे ग्रामसभा सदस्य कुंड खुर्द यांनी अध्यक्ष स्थान भूषवले . आपल्या कार्यक्रमांमध्ये श्री प्रमोदजी टाले साहेबांनी ग्रामस्थांसमोर विविध असे प्रयोग करून अंधश्रद्धा निर्मूलन करण्याचे काम केले ज्यामध्ये भोंदू बाबा कशाप्रकारे सामान्य माणसाची फसवणूक आणि आर्थिक पिळवणूक करतात हे प्रामुख्याने गावकऱ्यांना समजावून सांगितले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना पथक प्रमुख अनंत भुस्कट यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक शांतनु पाटील यांनी केले, कार्यक्रमाला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री 8.00 वाजता भोजन केले अशाप्रकारे शिबिराचा सहावा दिवस संपला.


Before
After


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W54X+X7, Kund Khurd, Maharashtra 443112, India


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W54X+X7, Kund Khurd, Maharashtra 443112, India




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नीत
डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
आजादी का अमृत महोत्सव
विशेष श्रमसंस्कार शिबीर
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
दत्तक ग्राम : कुंड
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910852°
Long 76.198787°
02/03/23 03:51 PM GMT +05:30


REDMI NOTE 8 PRO
MR.SK_STAR
02/03/2023 18:23

## शिबिराचा सातवा दिवस

## दिनांक 03/ 03 /2023 शुक्रवार

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सातवा दिवस म्हणजे दिनांक 03/03/ 2023, शुक्रवार या दिवशी सकाळी 6.00 ते 7.00 वाजताच्या दरम्यान प्रार्थना, प्रार्थना प्राणायाम योगाभ्यास घेण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवकांना नाश्ता देण्यात आला. सकाळी 7.30 वाजता स्वयंसेवकांद्वारे निर्मल ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची स्वच्छता करण्यात आली तसेच जिल्हा परिषद शाळेतील फळयांना व विद्यार्थ्यांच्या पाट्यांना स्वयंसेवकाद्वारे काळा रंग लावण्याचे काम श्रमदानातून करण्यात आले. श्रमदान दुपारी 12.00 वाजेपर्यंत चालले त्यानंतर स्वामी सेवकांनी वैयक्तिक स्वच्छता व भोजन करून आराम केला.

### बौद्धिक सत्र

दुपारी 3.00 वाजता बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले. या बौद्धिक सत्र मध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर गौतम मेहत्रे यांनी यांनी "महाविद्यालयीन जीवन व सामाजिक दायित्व" या विषयावर मार्गदर्शन केले. या सत्राचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा *योजना* स्वयंसेवक कुणाल देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रेयस यादगिरी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी केले, सायंकाळी 5.30 वाजता कार्यक्रमात झाली.

बौद्धिक सत्र संपल्यानंतर शिबिरार्थी यांनी गावकऱ्यांमध्ये ऑनलाइन आर्थिक व्यवहार याबद्दल जनजागृती करण्याकरिता गावातील चौका चौकामध्ये पथनाट्य सादर केले पथनाट्यातून ऑनलाइन फसवणूक कशी होते हे गावकऱ्यांना समजावून सांगितले व ऑनलाईन आर्थिक व्यवहार करताना कोणती काळजी घ्यायची त्याबद्दल सुयोग जामनेरकर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी माहिती दिली. रात्री 8.00 वाजता भोजनानंतर काही सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. व सर्व स्वयंसेवक झोपण्याकरिता गेले. अशाप्रकारे सातवा दिवस संपला.



GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910693°
Long 76.198206°
03/03/23 10:24 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.91068°
Long 76.198709°
03/03/23 10:19 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910785°
Long 76.198412°
03/03/23 10:03 AM GMT +05:30
Google


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नीत
डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी
मलकापूर जि.बुलडाणा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबीर
आजादी का अमृत महोत्सव
दि. २५ फेब्रुवारी २०२३ ते ०४ मार्च २०२३
दत्तक ग्राम : कुंड खुर्द ता.मलकापूर जि.बुलडाण
युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910664°
Long 76.198863°
03/03/23 03:38 PM GMT +05:30
Google


कार्यालय
प्रधानअध्यापक
अध्ययन फलक
GPS Map Camera
Kund Bk., Maharashtra, India
W644+J86, Kund Bk., Maharashtra 443112, India
Lat 20.906668°
Long 76.205722°
03/03/23 11:24 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+C83, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910957°
Long 76.198338°
03/03/23 12:03 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Google
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910852°
Long 76.198787°
03/03/23 06:21 PM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910852°
Long 76.198787°
03/03/23 06:17 PM GMT +05:30

## शिबिराचा आठवा दिवस

## दिनांक 04/ 03 /2023 शनिवार

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा आठवा दिवस म्हणजे दिनांक 04/03/ 2023, शनिवार या दिवशी सकाळी 6.00 ते 7.00 वाजताच्या दरम्यान प्रार्थना, प्रार्थना प्राणायाम योगाभ्यास घेण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवकांना नाश्ता देण्यात आला. सकाळी 7.30 वाजता स्वयंसेवकांद्वारे गावातील विविध सार्वजनिक ठिकाणी मंदिर परिसर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गावातील चौका चौकामध्ये गावकऱ्यांच्या सहभागाने वृक्षारोपण करण्यात आले. श्रमदान 11.00 वाजेपर्यंत चालले त्यानंतर स्वामी सेवकांनी वैयक्तिक स्वच्छता करून समारोप कार्यक्रमाची तयारी केली.

### समारोप कार्यक्रम

समारोप कार्यक्रम प्रसंगी सर्व स्वयंसेवक व गावकरी एकत्र आले, कार्यक्रम सह अधिकारी प्राध्यापक रितेश पोपट यांनी समारोप कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिशाली तिलोकार राष्ट्रीय सेवा योजना केले. समारोप कार्यक्रमासाठी दत्तक ग्राम कुंड खुर्द चे सामाजिक कार्यकर्ता व ग्रामसभा सदस्य श्री राकेश पाटील, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवाजी क्षीरसागर सर, शाळेच्या शिक्षिका परिहार मॅडम, डॉ. राजेंद्र गोडे फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख सर शैक्षणिक प्रशासक डॉ.वैभव आढाव सर व गावकरी मंडळी हे प्रामुख्याने उपस्थित होते. समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना सहकार्य अधिकारी प्राध्यापक रितेश पोपट यांनी केले त्यांनी उपस्थितांना शिबिरादरम्यान राबवण्यात आलेल्या निर्मळ ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत गावातील विविध ठिकाणी केलेल्या स्वच्छतेची तसेच इतर कार्यक्रम ज्यामध्ये प्रामुख्याने आरोग्य विषयक जनजागृती त्यामध्ये एड्स नियंत्रण, पोषण आहार, आणि अंधश्रद्धा निर्मूलन, ऑनलाइन आर्थिक व्यवहार करण्याकरता जनजागृती अशा विविध कार्यक्रमांची माहिती उपस्थित त्यांना दिली. यानंतर प्रमुख पाहुणे श्री राकेश पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले व गावकऱ्यांसाठी डॉ. राजेंद्र गोडे फार्मसी महाविद्यालय मलकापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकामार्फत राबवलेल्या विविध कार्यक्रमांचे कौतुक व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवाजी क्षीरसागर सरांनी आपले मनोगत व्यक्त करताना राष्ट्रीय सेवा योजना ही एक उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व विकासाचे व्यासपीठ असल्याचे आवर्जून सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर प्रशांत देशमुख यांनी आपल्या मनोगतामध्ये सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांचे विशेष श्रम संस्कार शिबिरा मार्फत केलेल्या कार्याचे कौतुक व समाधान व्यक्त केले.

समारोप कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक शांतनु पाटील यांनी केले. यानंतर ग्रामसभा सदस्य व गावातील समाजसेवक श्री राकेश पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजना पथकाची भोजन व्यवस्था केली.

### प्रस्थान

समारोप कार्यक्रम पार पाडल्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी शिबिर स्थळी स्वच्छता करून गावातील मंडळीशी अल्पशी चर्चा केली व सर्वांचा निरोप घेतला. कार्यक्रम अधिकारी यांच्या संमतीने व सूचनेप्रमाणे परत येण्यासाठी प्रस्थान केले.


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+HGQ, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.911497°
Long 76.198784°
04/03/23 09:39 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+HGQ, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.911485°
Long 76.198757°
04/03/23 09:38 AM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910716°
Long 76.198833°
04/03/23 11:53 AM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Kund Khurd, Maharashtra, India
W56X+7CH, Kund Khurd, Maharashtra 443112, India
Lat 20.910711°
Long 76.198805°
04/03/23 11:20 AM GMT +05:30
Google







प्रा. मुकेश बाभुळकर
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्रा.रितेश पोपट,
सह कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्रा.सी.एस. चांडक
महिला कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना